FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

0154187

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे खार, पहिली खबर क्र. 28, वर्ष 2022, दिनांक 31/05/2022
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1988 चे कलम 7, कलमे Sections
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार, तारीख पासून 27/05/22, वेळ 00:18, तारीख पर्यंत 30/05/22, वेळ 22:11
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 27/05/2022, वेळ ........
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 06, तारीख 31/05/22 वेळ 08:15
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तरेस 12KM, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki / Beat / O.P. Name and No. खार पोलीस ठाणे अंतर्गत बिट चौकी क्र. 1 जुना खार मार्केट
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ........, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण दत्त टी शॉप, गाव खार पश्चिम, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा मुंबई, राज्य महाराष्ट्र
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव खार पोलीस स्टेशन तालुका ........, जिल्हा मुंबई, राज्य महाराष्ट्र
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव इरफान फारुक डबावाला (b) वडिलांचे / पतीचे नाव फारुक अहमद हसन डबावाला
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 12/12/1980 वय 41 वर्ष (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9821338876
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय कार खरेदी
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste सुन्नी, जनजात Sub-Caste सुन्नी
(h) पत्ता रू.नं. 8, गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. अशोक मंजिल, फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव 35/36 रास्ता, जवळचे प्रसिद्ध ठिकाण इस्लाम जिमखाना गाव ........, पोस्ट ........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका कांदिवली पश्चिम, जिल्हा मुंबई ........ राज्य महाराष्ट्र ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

स्वप्निल बबनराव म्हासाळकर वय 35 वर्षे हुद्दा सहाय्यक पोलीस निरीक्षक नेमणूक खार पोलीस ठाणे, रा. ठि. 601, सांताक्रुझ पोलीस वसाहत, सांताक्रुझ पश्चिम



Scanned with OKEN Scanner

यातील तक्रारदार इखलाख गफार डब्बावाला वय 41 वर्षे यांनी तक्रार स्वतंत्र पानावरती संगणकावर टंकलिखित केली असून ती त्यांचा प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात आली आहे.

समक्ष,

(संतोष गुर्जर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

फिर्याद

दि. ३१/०५/२०२२

श्री. इखलाख गफार डब्बावाला, वय ४१ वर्षे, धंदा– कार खरेदी विक्रीचा व्यवसाय, रा.ठि. रूम नं. ८, पहिला मजला, शरीफ मंजील, ३७ वी गल्ली, बांद्रा (पश्चिम), मुंबई मो.क्र. ९८२१३३८८७६, ९०२२८९९९९९.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर जन्मापासुन माझे कुटुंबासह रहात आहे. माझा कार खरेदी विक्रीचा व्यवसाय असून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून मी माझे कुंटुबांचा उदरनिर्वाह चालवितो.

मी मन्सुरी मेन्शन, ३७ वी गल्ली, बांद्रा पश्चिम, मुंबई या बिल्डींगचा व जमीनीचा मालक आहे. नमुद बिल्डींग मी सन २०११ मध्ये श्री. दिनेश रिटा यांच्याकडुन कनव्हिन्स डीड करून खरेदी केलेली आहे. नमुद बिल्डींग तळमजला + दोन मजल्याची आहे. सदर बिल्डींगच्या तळमजल्यावर ५ घर असुन त्यातील २ घर मालकानी त्याचे घराचे ७ दुकाने पाडून बेकायदेशीर बांधकाम केलेले आहे. मागच्या वर्षी सन २०२१ मध्ये झालेल्या पावसाळा दरम्यान नमुद बिल्डीगचा सज्जा पडला होता. त्यावेळी बीएमसीच्या टॅग कमिटीने नमुद बिल्डींग मोडकळीस आल्याचे सांगुन सदर बिल्डींग निष्कासित करण्याची नोटीस दिली होती. सदर नोटीस संदर्भात मी खार पोलीस ठाणे येथे जावुन माहिती दिलेली होती. त्यानंतर मला बीएमसी विभागाकडुन मिळालेल्या नोटीसच्या अनुषंगाने मन्सुरी बिल्डीगच्या कंपाऊन्डच्या आजुबाजुस पत्रे लावुन घेतले.

दिनांक १७/०५/२०२२ रोजी खार पोलीस ठाणे, मुंबई येथील API स्वप्नील मासळकर यांनी मला माझे मोबाईलवर कॉल करून सांगितले की, मन्सुरी मेन्शन येथील बेकायदेशीर दुकानदारांनी माझेविरोधात तक्रार केली आहे. त्यावरून मी माझा चुलत भाऊ शदाफ शेख यांचेसोबत खार पोलीस ठाणे येथील API स्वप्नील मासळकर यांना भेटण्याकरीता गेलो असता, त्यावेळी API स्वप्नील मासळकर यांनी मला मन्सुरी बिल्डीगमधील दुकानदारांना बेकायदेशीररित्या प्रतिबंध केले म्हणुन माझे विरोधात कलम ३४१, ५०६(२) भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करावा लागेल असे सांगुन बिल्डीगचे कागदपत्र जमा करण्यास सांगितले.

त्यानंतर दिनांक २६/०५/२०२२ रोजी API स्वप्नील मासळकर हे रात्रपाळी कर्तव्यावर असताना माझा चुलत भाऊ शदाफ शेख हा त्यांना भेटण्याकरीता गेला. त्यावेळी API स्वप्नील मासळकर यांनी त्यास मन्सुरी मेन्शन येथील बेकायदेशीर दुकानदारांनी केलेल्या तक्रारअर्जावरून माझेवर गुन्हा दाखल करावयाचा नसल्यास रू. ८०,०००/– इतकी रक्कम दयावी लागेल असे सांगितले. त्यावेळी माझे चुलत भाऊ शदाफ शेख याने माझे बिल्डींगचे सर्व पेपरर्स API मासळकर यांना दाखविले. त्यावेळी API मासळकर यांनी बिल्डींगचे पेपरर्स घेतले नाहीत. व माझे चुलत भावाकडे रू.८०,०००/– इतक्या लाचेची मागणी केली.

मला API स्वप्नील मासळकर यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी, माझा चुलत भाऊ शदाफ शेख याचेसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक २७/०५/२०२२ रोजी सांयकाळी त्यांचे विरूध्द तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन पो.नि. संतोष गुर्जर व स.पो.आ. सोपान गोंधे यांना नेमण्यात आले व मला व्यवस्थित लिहीता येत नसल्याने पो.नि. संतोष गुर्जर यांनी त्यांचे लॅपटॉपवर माझे सांगणेप्रमाणे हिंदीतुन तक्रार टंकलिखीत केली व मला समजावुन सांगितली. त्यानंतर माझी खात्री पटल्यावर मी नमुद तक्रारअर्जावर स्वाक्षरी केली.

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी माझे तक्रारीच्या अनुषंगाने दोन पंचासमक्ष पडताळणी कारवाई करण्यात आली. पो.नि. गुर्जर यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून माझा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. गुर्जर यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. गुर्जर यांनी स्वतः स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वतःचे ताब्यात ठेवला व पंचांसमक्ष खार पोलीस ठाणे, मुंबई येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. स्वप्नील मासळकर यांची प्रत्यक्ष भेट घेवून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे

Scanned with OKEN Scanner

शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

त्यांनतर पो.नि. गुर्जर यांनी माझी पडताळणी पथकाशी ओळख करून दिली. त्यानंतर प्राथमिक सोपस्कार आटोपल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह पोलीस वाहनाने निघून सासमिरा जक्शन, वरळी, मुंबई येथे आलो असता, तेथे पो.नि. गुर्जर यांनी माझे, स्वत:चे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मला नमुद तक्रारीमधील नमुद लोकसेवक आज रोजी कर्तव्यावर आहेत किंवा कसे याबाबत त्यांना संपर्क करण्यास सांगितले. त्यावरुन मी माझे मो.न. ९०२२८९९९९९ वरुन लोकसेवक स.पो. नि. मासळकर यांचा मो.न. ९९२२१०१६९० वर कॉल करुन माझा मोबाईलचा स्पिकर ऑन केला असता, मी " लोकसेवक यांना भेटण्यासाठी विचारणा केली असता, लोकसेवक मासळकर यांनी ते पेट्रोलिंग करीत असल्याबाबत सांगून दहा मिनिटांनी कॉल करतो असे सांगितले. सदरच्या कॉलमधील संभाषण पो.नि. गुर्जर यांनी पो.शि.सोनोने यांच्या मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केला.

त्यानंतर आम्ही पुढे माहिम दर्गा, खार एस.व्ही रोड, हिल रोड, हॉली फॅमिली चर्च, बालाजी हॉटेल, बडी मस्जिद, बांद्रा, मुंबई येथील रस्त्यालगत थांबलो. त्यानंतर बराच वेळ लोकसेवक यांनी संपर्क न केल्याने पुन्हा लोकसेवक यांचे मोबईल फोनवर संपर्क करण्याचे ठरविले. त्यावेळी मी त्यांचे मोबाईल फोनवरून लोकसेवक स.पो. नि. मासळकर यांचा मो.न. ९९२२१०१६९० वर कॉल करुन माझा मोबाईलचा स्पिकर ऑन केला असता, मी प्रथम लोकसेवक यांना परत फोन न केल्याबाबत विचारणा केली. त्यावेळी लोकेसवक यांनी ते मला फोन करण्यास विसरले असे सांगून अर्ध्या तासात भेटतो असे सांगितले. सदरच्या कॉलमधील संभाषण पो.नि. गुर्जर यांनी पो.शि. सोनोने यांच्या मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केलो

पोनि गुर्जर यांच्या सुचनेवरून पोलीस वाहन बांद्रा (प) येथील माऊंट मेरी मंदिर रोडच्या दिशेने नेण्यात आले. तेथे काहीवेळ लोकसेवक यांचे फोनची वाट बघितल्यानंतर पुन्हा लोकसेवक यांना संपर्क केला असता, लोकसेवकाने फोन उचलेला नाही.

त्यानंतर काही वेळाने लोकसेवक यांनी त्यांचे मोबाईल क्र. ९९२२१०१६९० वरून माझे मोबाईल क्र. ९०२२८९९९९९ वर कॉल केला. त्यावेळी पोनि गुर्जर यांच्या सुचनेवरून मी माझ्या मोबाईलचा स्पिकर ऑन केला. त्यावेळेस लोकसेवक यांनी ते बिट चौकी १ येथे असल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना दहा ते पंधरा मिनिटांत येवून भेटतो असे सांगितले. सदरच्या कॉलमधील संभाषण पो.नि.गुर्जर यांनी पो.शि. सोनोने यांच्या मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केला.

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मला सांगितले की, लोकसेवकाची भेट घेण्यास जाण्यापूर्वी मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टचे आत बनियनला लावणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर मला पो.नि. गुर्जर यांनी पडताळणीकरीता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाचे आतील बनियनला लावून माझा भाऊ व पंच श्री. खेडकर यांचे सह लोकसेवक स्वप्निल मासळकर, सपोनि यांनी बोलाविलेल्या बीट चौकी क्र. १, जुना खार मार्केटच्या दिशेने रवाना झालो. मी, माझा चुलत भाऊ व पंच श्री. खेडकर यांच्यासोबत लोकसेवक यांनी बालाविलेल्या जुना खार मार्केट चौकी, बिट क्र. १, खार, मुंबई येथे गेलो असता, लोकसेवक स.पो.नि. मासळकर हे चौकीमध्ये उपस्थित होते. लोकेसवक यांनी मला व माझा चुलत भाऊ यांना बसण्यास सांगून पंच श्री. खेडकर यांच्याबाबत विचारणा करून त्यांना पोलीस चौकीच्या बाहेर जावून थांबण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक व माझ्यात माझे विरूध्द प्राप्त तक्रारी अर्जाबाबत चर्चा झाली. त्यादरम्यान मी स.पो.नि. मासळकर यांना लाचेची रक्कम कमी करून साठ हजार करण्याबाबत विनंती केली असता, लोकसेवक मासळकर यांनी 'सेवन झिरो' असे बोलुन मोबाईल फोनवर गुगलवर रू.७०,०००/– अशी रक्कम टाईप करून लाचेची मागणी करून नमुद लाचेची रक्कम सोमवारी दिनांक ३०/०५/२०२२ रोजी घेवुन येण्यास सांगुन

Scanned with OKEN Scanner

स्विकारण्याचे कबुल केले व मला फोन करून येण्यास सांगितले. त्यानंतर मी, माझा चुलत भाऊ व पंच श्री. खेडकर असे तेथून निघुन ठरल्याप्रमाणे शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी आलो.

त्यानंतर पोनि गुर्जर यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक स.पो.नि. स्वप्नील मासळकर यांनी पडताळणी कारवाई दरम्यान लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने व लोकसेवक स.पो.नि. मासळकर यांनी दिनांक ३०/०५/२०२२ रोजी लाचेची रक्कम रू.७०,०००/- घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मला लोकसेवक स.पो.नि. मासळकर यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले असुन पुढील सापळा कारवाई करीता मला दिनांक ३०/०५/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी मुंबई येथे लोकसेवक स.पो.नि. मासळकर यांनी मागणी केल्याप्रमाणे रोख रुपये ७०,०००/- घेवुन येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे आज दिनांक ३०/०५/२०२२ रोजी मी माझे वैयक्तिक बचतीमधून शिल्लक रोख रुपये ७०,०००/- त्यामध्ये भारतीय चलनाच्या ५०० दराच्या १४० नोटा लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी मुंबई येथे घेवुन आलो व मी पो.नि. गुर्जर यांना लाचेच्या रक्कमेची व्यवस्था झाली असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ७०,०००/- (रू. ५००/- दराच्या १४० भारतीय चलनी नोटा) त्यांनी स्वतःचे ताब्यात घेतल्या. त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मोबाईलवर फोटो काढुन त्यांनतर त्यांची प्रिन्ट काढणार असल्याचे मला सांगितले. व त्यांच्या झेरॉक्स काढल्या. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पोनि गुर्जर यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझ्या पॅन्टच्या उजव्याा खिशातील हातरूमाल काढून तोंडावरून वांरवार हातरुमालाने पुसणे असा पुर्व नियोजीत इशारा करावा, त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहाथ पकडतील असे सांगितले.

त्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयातच पंचासमक्ष एका अंमलदाराच्या मार्फतीने लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची रक्कम माझे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर लोकसेवक मासळकर कार्यालयात आहे किंवा कसे हे विचारण्याकरीता माझे मोबाईल क्र. ९०२२८९९९९९ वरून लोकसेवक मासळकर यासं त्याचे मोबाईल क्र. ९९२२१०१६९० वर संपर्क करून लोकसेवक चौकीमध्ये आहेत का? याची खात्री केली. त्यावेळी लोकेसवक मासळकर यांनी ते चौकीमध्ये असून रात्रौ ८.३० पर्यंत चौकीत येण्यास सांगितले.

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मला, माझा भाऊ व पंच क्र. १ श्री. खेडकर यांना शासकीय वाहनातून खार पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या बिट चौकी क्र. १ च्या अलीकडे मुख्य रस्त्यावर सोडले. तेथून मी, माझा भाऊ व पंच क्र. १ हे चालत चालत बिट चौकी क्र. १ येथे लोकसेवक श्री. मासळकर यांना भेटण्यास गेलो. भेटीदरम्यान लोकसेवक त्यांचे कामकाजामध्ये व्यस्त होते. लोकसेवक मसाळकर यांनी माझेसोबत असलेले पंच श्री. खेडकर यांचेबाबत विचारणा केली. मी ते सिक्युरीटी गार्ड असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री. मासळकर यांनी मला, माझा चुलत भाऊ शादाब शेख व पंच यांना त्यांचे मोबाईल फोन बाजूला ठेवून देण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री. मासळकर यांनी माझ्याशी त्यांचे विरूध्द प्राप्त तक्रार अर्जाबाबत चौकशी केली. सदर चर्चे दरम्यान लोकसेवकाने मान हलवून इशाऱ्याने लाचेची रक्कम आणल्याबाबत विचारले. त्यावेळी मी हो असे सांगितले. त्यावेळी मी माझे पॅन्टच्या उजव्या बाजूच्या खिशातून लाचेची रक्कम रू. ७०,०००/- (रू. ५००/- दराच्या १४० चलनी नोटा) बाहेर काढून लोकसेवक श्री. मासळकर यांचेसमोर धरली असता, लोकसेवक मासळकर यांनी नमूद लाचेची रक्कम रू. ७०,०००/- उजव्या हाताने स्विकारून ती टेबलच्या ड्रॉव्हर मध्ये ठेवली. त्यावेळी पंच श्री. खेडकर हे देखील त्याठिकाणी उपस्थित होते. त्यानंतर मी, पंच श्री. खेडकर व त्यांचा चुलत भाऊ शादाब शेख हे चौकीच्या बाहेर आले. मी लोकसेवक श्री. मासळकर यांनी लाच स्विकारली असल्याबाबतचा रूमाल तोंडावरून फिरवून पूर्वनियोजित इशारा केला असता, चौकीच्या बाहेरील बाजूस सापळा पथकातील उभ्या असलेल्या पो.ना. गावडे यांनी चौकीच्या आतमध्ये जावून लोकसेवक यांचे उजवा व डावा हात पकडून ताब्यात घेतले.माझ्या मालकी

Scanned with OKEN Scanner

हक्काच्या मन्सुरी मेन्शन, बांद्रा, मुंबई या इमारतीस महानगरपालिकेकडुन धोकादायक इमारत म्हणुन नोटीस बजावल्याने मी नमुद बिल्डींगच्या आजुबाजुस लोखंडी पत्रे लावलेले आहेत. नमुद बिल्डींगमधील दुकानदारांनी ये—जा करण्यासाठी बेकायदेशीर प्रतिबंध होत असलेबाबत माझे विरोधात खार पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार अर्ज केला आहे. नमुद तक्रारीअर्जाच्या अनुषंगाने माझे विरोधात गुन्हा दाखल न करण्यासाठी लोकसेवक यांनी रू. ८०,०००/— इतकी लाचेची रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू.७०,०००/— स्वत:करीता स्विकारण्याचे मान्य करून नमूद लाचेची रक्कम रू. ७०,०००/— आज रोजी माझेकडून स्वीकारली. म्हणुन माझी खार पोलीस ठाणेतील स.पो.नि. स्वप्नील मासळकर यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक स.पो.नि. स्वप्नील मासळकर यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला हिंदीतून समजावून सांगितली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( संतोष गुर्जर ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

ने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..............................................................

ons for delay in reporting by the Complainant / Informant

स गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

articulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..............................................................................................................................

. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

2. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

वरील नमूद तारीख, वेळ, व ठिकाणी कॉलम नं. ७ मधील आरोपी यांनी यातील फिर्यादी यांचे मालकी हक्काचे रहतेल्या इमारतीस महानगरपालिकेकडून धोकादायक इमारत म्हणून नोटीस, बजावल्याने फिर्यादी यांनी नमूद इमारतीच्या ता[illegible] लोखंडी पत्रे लावलेले आहेत. नमूद बिल्डींगमध्ये असलेल्या दुकानदारांनी दुकानामध्ये ये-जा करण्यासाठी लोकांना प्रतिबंध होत असल्याबाबत फिर्यादी यांचे विरोधात खार पोलीस ठाणे येथे तक्रार अर्ज केलेला आहे. नमूद तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने फिर्यादी यांचे विरोधात गुन्हा दाखल न करण्यासाठी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम रु. ५०,०००/- ची मागणी केली व रु. ५०,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडले, म्हणून त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

3. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..............................................................................................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..............................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यांत आला. पोलीस स्टेशन......................, जिल्हा.................., राज्य..................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank............... No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................

District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

4. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

INSPECTOR OF POLICE
ANTI-CORRUPTION BUREAU
सत्यमेव जयते
MUMBAI

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ..(संतोष गुर्जर)..................
पदनाम Rank......पोलीस निरीक्षक,.................
तपासिक अ..लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.........
Posting
Code No. of I. O. ..................................................

5. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........................
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| त, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| opy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

tachment to item 7 of First Information Report